जाहिरात

# महाराष्ट्र शासन
आरोग्य सेवा
## राष्ट्रीय आरोग्य अभियान

| अ.क्र. | पदाचे नाव | कामाचे ठिकाण | वयोमर्यादा | शैक्षणिक अर्हता | पदांची संख्या | मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भौतिकोपचार तज्ञ | मुंबई. | ४५ वर्षापेक्षा अधिक नसावे | भौतिकोपचार मधील मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी, विकृती रुग्णास भौतिक उपचार दिल्याबाबत १ वर्षाचा अनुभव. संगणाक हाताळण्याचे ज्ञान असणे आवश्यक. | १ | २०,०००/- |

अटी व शर्ती

१) उपरोक्त पद हे कंत्राटी स्वरुपाचे असुन नियुक्ती ११ महिन्याच्या कालावधी करीता राहील

२) जाहिरातीतील पद राज्य शासनाचे नियमित पद नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपाचे पद आहे. सदर पदावर कायम पणाचा हक्क राहणार नाही. तसेच या पदा साठी शासनाचे सेवा नियम लागु नाही, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किवां त्यासंबधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही

३) अर्जदार हा संबधीत पदा साठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा

४) उपरोक्त कंत्राटी पदाकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल

५) जाहिरातीमधील रीक्त पदाच्या संख्येत बदल होवु शकतो तसेच रिक्त ठिकाणा मध्ये बदल होऊ शकतो या बाबतचे सर्व अधिकार मा.अध्यक्ष जिल्हा कुष्ठरोग समिती तथा कार्यकारी आरोग्य अधिकारी बृहन्मुंबई म. न.पा यांनी राखुन ठेवले आहे.

६) अनुभवी व उच्च शैक्षणिक अहर्ता धारकास प्राधन्य दिले जाईल

७) भौतिकोपचार तज्ञ पदाकरीता कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष राहील

८) उपरोक्त पदाकरीता तत्सम कौन्सिलचे रजिस्ट्रशनचे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारास मुलाखतीस अपात्र ठरविले जाईल

९) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रद्द करणे / पद भरती प्रकियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा.अध्यक्ष जिल्हा कुष्ठरोग समिती तथा कार्यकारी आरोग्य अधिकारी बृहन्मुंबई म.न.पा. यांनी यांचे स्तरावर राखुन ठेण्यात आलेले आहेत.या बाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

१०) सदर भरतीची प्रक्रिया पुर्ण झाले नंतर भविष्यात जर एखाद्या ठीकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिल्यामुळे जागा रिक्त झाल्यास प्रतिक्षा यादी वरील उमेदवारास नवीन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील

**वरील पदाकरीता मुलाखत दि.०७ मार्च २०२२ रोजी थेट मुलाखत पद्धतीने घेण्यात येईल याची उमेदवारानी नोदं ध्यावी वेळ सकाळी १०.०० वाजता**

**ठिकाण- सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग) मुंबई कार्यालय, कामगार रुग्णालय ( ई.एस.आय.एस हॉस्पीटल ) नर्सेस क्वार्टरर्स, २ रा मजला, एल.बी.एस.मार्ग, मुंलुड (पश्चिम) मुंबई.**

खालील प्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्रांच्या साक्षांकीत केलेल्या छांयाकीत प्रती अर्जाच्या नमुन्याला जोडाव्यात

१)शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका

२) शाळा सोडल्याचा दाखला /जन्म तारखेचा दाखला

३)प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्र

४)पासपोर्ट आकाराचे २ फोटो

५) शासकीय अनुभव असल्यास अनुभव दाखला

मुलाखतीतील अटी, शर्ती/ नियम बाबतीत शिथिलता करण्याचे अधिकार समितीने राखुन ठेवले आहे. त्यामुळे पदांमध्ये गरजेनुसार बदल होवु शकतो.

सहाय्यक संचालक
आरोग्य सेवा (कुष्ठ) मुंबई

Scanned with CamScanner